पुणे पोलीस


## जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र.३३६२** **दि. ०६/११/२०१९**

**हडपसर पोलीस स्टेशन पुणे**

प्रेस नोट ता. ०६/११/२०१९

**पुणे शहर व पुणे ग्रामीण पोलीसांना गेले अनेक वर्षापासुन दरोडे, जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी करुन पुणे पोलीसांना गुंगारा देवुन धुमाकुळ घालणाऱ्या अटटल दरोडेखोरास व त्यांचे साथीदारांना हडपसर पोलीसांनी जेरबंद करुन त्यांचेकडून जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरीचे एकुण ११७ गुन्हयांचा उलगडा करुन सव्वा कोटीचा माल हस्तगत करणेत यश आले आहे.**

पुणे शहर, पिंपरी चिंचवड आयुक्तालय पुणे, पुणे ग्रामीण जिल्हयात दरोडे, जबरी चोरी, घरफोडी , वाहन चोरी करणारा अटटल गुन्हेगार पैतरसिंग ऊर्फ पवित्रसिंग गब्बरसिंग टाक वय १९ वर्षे रा. कैलास स्मशानभुमी समोर, आनंदनगर, रामटेकडी, हडपसर पुणे हा मांजरी बुद्रुक गावातुन मोरे वस्ती मार्गे त्याचे साथीदारासह नाकोडा ज्वेलर्सची घरफोडी करुन त्यांनी ३०तोळे सोने व ४० किलो चांदी लुटताना वापरलेली टाटा टॅंगो कार नंबर एम एच १२ क्युटी ९७२५ मधुन हायवेकडे जाणार आहेत अशी माहिती हडपसर तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पो. ना. प्रताप गायकवाड, पो.शि. नितीन मुंढे, पो.ना. विनोद शिवले, पो. शि. अकबर शेख, पो. शि. शाहिद शेख यांना मिळाली. त्यांनी मोरे वस्ती जवळ रेल्वे क्रॉसिंगचे पुलाखाली दबा धरुन रोडवर बसले. वरील गाडी पुलाखाली येताच त्यास थांबवुन पकडत असताना कर्मचारी **प्रताप गायकवाड** हे जखमी झाले असताना देखील जखमी अवस्थेत स्टाफसह त्यांना पकडून जागेच जेरबंद केले.

सदर आरोपीकडे गुन्हयाचे अनुषगाने तपास केले असता त्यांनी पुणे शहरात, पिंपरी चिंचवड आयुक्तालयात पुणे आणि पुणे ग्रामीण भागात वेगवेगळया ठिकाणी गेले दिड वर्षापासुन वेगवेगळया साथीदार घेवुन पैतरसिंग गब्बरसिंग टाक हा पुणे शहरात मोटार सायकलवरुन वॉचमन नसलेल्या घराची रेखी करुन चोरलेल्या चारचाकी गाडीतुन त्यांनी **दरोडे, जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरीचे एकुण ११७ गुन्हे केलेचे कबुल करुन आत्ता पर्यत आरोपी नामे** १) पैतरसिंग ऊर्फ पवित्रसिंग गब्बरसिंग टाक वय १९ वर्षे रा. कैलास स्मशानभुमी समोर, आनंदनगर, रामटेकडी, हडपसर पुणे.२) निशांत अनिल ननवरे वय २२ वर्षे रा. ताडीवाला रोड, पुणे ३) ऋषिकेश तानाजी आतकर वय २० वर्षे रा. तुकाईनगर, वडगाव बुद्रुक पुणे यांचेकडून दरोडा, घरफोडी, जबरी चोरी व वाहन चोरीच्या गुन्हयातील **विविध कंपन्याचे १३ चारचाकी कार, विविध कंपन्याचे ०५ दुचाकी /मोटार सायकली ३८ किलो चांदी, ११०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असे एकुण १ कोटी १९ लाख, ७० हजार रुपयेचा माल दरोडा, घरफोडी चोरी, जबरी चोरी, वाहन चोरीचे केलेल्या गुन्हयातील हस्तगत करणेत आला आहे.यामध्ये नाकोडा ज्वेलर्स येथील घर फोडी मधील २६तोळे सोने व ३८किलो चांदी जप्त करण्यात आली** आहे.

सदरची कार्यवाई मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा.. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर मा. सुनिल कलगुटकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सहा. पोलीस फौजदार युसुफ पठाण, पो. हवा. राजेश नवले, पो. हवा. संपत औचरे पो. ना. प्रताप गायकवाड, पो. ना. विनोद शिवले, पो. ना. सैदोबा भोजराव, पो. ना. राजु वेगरे, पो. शि. नितीन मुंढे, पो. शि. अकबर शेख, पो. शि. शाहिद शेख, पो. शि. गोविंद चिवळे,पो.शि.कुसाळकर पो. शि. शशिकांत नाळे, पो. शि. विजय पवार, पो. शि. ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.


पोलीस आयुक्तालय पुणे शहर
पोलीस आयुक्तालय पुणे शहर


पोलीस आयुक्तालय पुणे शहर
हडपसर पोलीस स्टेशन
पोलीस आयुक्तालय पुणे शहर
हडपसर पोलीस स्टेशन